अपूर्ण कथा पूर्ण करा.

सहल

आमच्या शाळेची सहल निघाली होती बस ने प्रवास म्हणून सर्वच मुले आनंदात होती. गाणी गप्पागोष्टी रंगल्या होत्या पुढचा प्रवास जंगलातून होता. रात्रीचा प्रवास सर्वत्र काळोख रात्रीची शांतता सर्वच अंगावर शहारे आणणारे बसचा आवाज तेवढा रात्रीची शांतता भंग करत होता. अचानक बस थांबली सर्वानाच काय झाले? याची उतकंठा मी समोर पाहिले गाडीच्या प्रकाशात समोर अत्यंत ओमेद(मोठे) जनावर उभे होते. वाघाचे डोळे चमकत होते. आणि अचानक.....

पुर्ण कथा

असा प्रकार घडला की एका मागे एक असे अनेक वाघ आमच्या बस समोर येऊन थांबले आणि बसच्या अवतीभवती फिरु लागले. आम्हाला काही सुचेनासे झाले. आमचा जीव धोक्यात पडला होता. मी कधीही एवढे वाघ एकत्र पाहिले नव्हते बस मध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते काही जण तर अक्षरशः रडू लागले होते कोणालाच काय करावे कळत नव्हतेतेवढ्यात आमच्या सरांनी बस मधील सर्व विद्यार्थ्यांना शांत बसण्यास सांगितले आणि बसच्या सर्व खिडक्या लावून घेण्यास सांगितले. ड्रायवर काकांनी कितीही वेळा हॉर्न वाजून वाघांना बसच्या समोरून हटवण्याचा प्रयत्न केला. पण वाघ समोरून सरकण्याचे नाव घेत न्हवते. आम्ही मात्र स्तब्ध होतो जणू आपल्यावर आता डोंगरच कोसळला आहे.

एवढ्यात माझी नजर खिडकीतून शेजारी असलेल्या जंगलात गेली. जंगलात वृक्ष तोड झाली होती तेव्हा माझ्या लक्षात आले की, माणसाने वाघांची वस्ती, निवारा एकप्रकारे नष्ट केलेली होती. वाघांचा निवारा नष्ट झाल्यामुळे ते रस्त्यावर येऊन आमच्या बस समोर येउन बसलेली होती. जणू ते आम्हाला प्रशन करत होते की आमच्या निवासाची जागा तुम्ही मानव नष्ट करत आहात. आता आम्ही कुठे राहायचे? असा प्रश्न तर करत नसतील ना! असा विचार मनामध्ये येऊन गेला.

थोड्या वेळाने सर्व वाघ बाजूला झाले परंतु त्याने विचार करण्यास भाग पाडले होते. आपण आपल्या स्वार्थासाठी दुसऱ्याची घरे उध्वस्त करत आहे हे योग्य नाही. जेवढा हक्क आपला या पृथ्वी वर आहे तेवढाच हक्क इतरांचा देखील आहे हे आपण विसरायला नको.

तसे पण निसर्ग सुरक्षित ठेवायला पाहिजे वृक्ष तोड कमी करून वृक्षांची काळजी घेतली पाहिजे. झाडे आहेत तर पाऊस वेळेवर पडतो. म्हणून मानवाने निसर्ग संपवू नये निसर्ग जर आपण संपवलो तर याचे अनेक परिणाम मानवाला भविष्यात होणार आहेत.